KAYASTH
Caters & Event Management

Rajendra Deochand Kayasth-9657572742 | 7350565657
Karanja Chowk,Shiv Shopping Complex,Buldana-443001

Title Code- MAHMAR-51647

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784
Email- jansanchlan@gmail.com

आकर्षक व दर्जेदार स्कीमसह
युसीएन सिटी डिजिटल सेट-टॉप बॉक्स आपल्या घरी..
UCN
Digital TV & Broadband Services

संपर्क :- 9129582958
पत्ता - शिव शॉपिंग कॉम्प्लेक्स बुलडाणा अर्बन मुख्यालय समोर बुलडाणा

वर्ष ३ रे | अंक : ७१३ . वा | मंगळवार | दि. १९ मार्च २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३रुपये

# जिल्ह्याच्या विकासासाठी जनसंपर्क असणारा दूरदर्शी खासदारच हवा...

## भाईजींसारखे अजातशत्रू नेतृत्व जिल्ह्यासाठी ठरणार फलदायी



भाग-9

**जनसंचलन/बुलढाणा**

गेल्या दीड दशकामध्ये ज्यांच्या पदरात जिल्हावासीयांनी भरभरून असे मतांचे दान टाकले, त्यांनी जिल्ह्यातील नागरिकांची पुरती निराशा केली आहे. जिल्ह्यात सध्या विकासाची गंगा पूर्णपणे आटलेली दिसून येत असून, या विकासाच्या गंगेला प्रवाहित करण्यासाठी राधेश्याम चांडक उर्फ भाईजी यांचासारखा दूरदर्शी व दांडगा जनसंपर्क असणारा नेता आवश्यक आहे. भाईजी यांच्यासारखा उमेदवार या ठिकाणी असल्यास त्यांना समाजाच्या सर्वच स्तरातून मोठ्या प्रमाणात सकारात्मक प्रतिसाद मिळू शकतो, त्यामुळे त्यांच्या निवडून येण्याची शक्यात खूपच जास्त आहे. शिवाय भाजपचे नेते व पदाधिकाऱ्यांमध्येही भाईजींविषयी आपुलकीचा ओलावा आहे, त्यामुळे त्यांच्यासाठी भाजपकडून तन-मन-धनाने काम करणारे कार्यकर्ते कामाला लागू शकतात. पर्यायाने ती भाजपसाठी एक जमेची बाजू ठरू शकते. बुलढाणा लोकसभा मतदारसंघात २०१९ पासूनच नेतृत्व बदलाची मागणी होत होती. त्या वेळी देखील हा मतदारसंघ भाजपकडे यावा, अशी इच्छा अनेक भाजपा पदाधिकारी व कार्यकर्त्यांची होती. परंतु युतीचा धर्म निभावायचा आहे, तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पुन्हा पंतप्रधान करायचे आहे, या मजबूत इच्छाशक्तीमुळे प्रतापराव जाधव यांच्या गळ्यात विनासायास विजयाची माळ पडली. मात्र, प्रतापरावांनी मागील दोन टर्म प्रमाणेच तिसऱ्या टर्ममध्येही आपल्या निष्क्रियतेचा पाढाच वाचला. १५ वर्षे बुलढाणा लोकसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करून देखील आजही प्रतापराव हे छातीठोकपणे हे सांगू शकत नाहीत की जिल्ह्यात त्यांनी कोणता मोठा प्रकल्प आणला? त्यांनी आणलेल्या प्रकल्पामुळे किती जणांना रोजगार मिळाला? पायाभूत सुविधांच्या बाबतीत बुलढाणा जिल्हा किती पुढे गेला? जिल्ह्यातून मजुरांचे होणारे स्थलांतर थांबवण्यासाठी त्यांनी कोणते ठोस प्रयत्न केले? जिल्ह्यात शिक्षण क्षेत्र मजबूत करण्यासाठी काय ठोस प्रयत्न केले? सिंचनाचे कोणते प्रकल्प मार्गी लावण्यासाठी दिल्ली दरबारी आवाज बुलंद केला? या सर्व प्रश्नांची उत्तरे जनतेकडून नकारात्मकच मिळतील, याची आम्हाला खात्री आहे. याच्या अगदी उलट जिल्ह्यात विकासाच्या दृष्टीने राधेश्याम चांडक उर्फ भाईजींनी अनेक वर्षे स्वतःला झिजवण्याचे काम केले. जेव्हढा रोजगार भाईजींनी तयार केला, त्याच्या १० टक्केही रोजगार प्रतापरावांच्या प्रयत्नांमुळे आजवर झाला नाही. सहकाराच्या माध्यमातून भाईजींनी अनेक विकासकामे आजवर केलेली आहेत. त्यांच्या विकासकामांचा थेट लाभ हा जिल्ह्यातील नागरिकांना झालेला आहे. शैक्षणिक क्षेत्रातही भाईजींचे कार्य मोठे आहे. मुळातच जनमानसामध्ये एक विकासात्मक दृष्टिकोन असलेले व्यक्तिमत्व म्हणून भाईजींची प्रतिमा आहे. त्यांच्या या उत्तुंग अशा प्रतिमेमुळेच त्यांना मतदारांचा मोठा पाठिंबा मिळू शकतो. एव्हढेच नाही तर जनतेने त्यांना खासदार होण्याची संधी दिली, नक्कीच पुढील पाच वर्षांत मतदारसंघाचा चेहरामोहरा बदलण्यास मदत मिळू शकते. जिल्ह्यात काही मोठे प्रकल्प येऊ शकतात, ज्याद्वारे हजारो हातांना रोजगाराची संधी मिळेल. जिल्ह्यात प्रलंबित असलेल्या विविध प्रकारच्या विकासकामांना चालना मिळू शकते. भाईजी हे सहकार आणि सरकार यामध्ये योग्य तो ताळमेळ साधून जिल्ह्याच्या विकास करू शकतात. काही दिवसांपूर्वी राज्य शासनाने खामगाव-जालना रेल्वे मार्गासाठी निधीची तरतूद केली. त्याच दिवशी भाईजींनी ३०० कोटींचे रोखे बुलढाणा अर्बन उभारणार असल्याची घोषणा केली. आज ही दृष्टी आणि ही शक्ती भाईजींकडे आहे. जिल्ह्यातील पर्यटन स्थळे असतील किंवा विविध प्रकारची देवस्थाने असतील, या सर्वांच्या विकासाच्या दृष्टीने भाईजी महत्वपूर्ण कामगिरी करू शकतात. याद्वारे जिल्ह्यात पर्यटनाला व तीर्थाटनाला येणाऱ्यांची संख्या वाढेल व त्यातून या ठिकाणी रोजगार निर्मिती होईल, तसेच जिल्ह्याच्या विकासाला चालना मिळेल. या सर्व भाईजींच्या जमेच्या बाजू आहेत. या उलट प्रतापराव जाधव यांच्याकडे सांगण्यासारखे असे ठोस काहीही काम नाही. प्रतापरावांकडे विकासात्मक दृष्टीचा मोठा अभाव असल्याचे आता जिल्ह्यातील प्रत्येक मतदाराला माहिती झालेले आहे. त्यामुळे आगामी काळात तरी एखादा दूरदृष्टी असलेला नेता जिल्ह्याला मिळावा, या उद्देशानेच भाईजींकडे जिल्ह्याची धुरा यावी, असे मत राजकीय कार्यकर्ते व सामान्य नागरिकदेखील व्यक्त करू लागले आहेत.

**बुलडाणा जिल्ह्यातील लोकसभा २०२४ निवडणूकीत एकूण मतदान १७ लाख ६४ हजार असून बुलडाणा जिल्हा भाजपा पक्षातून प्रतापराव जाधव यांच्या विरोधात नाराजी असल्याने ती आज चव्हाट्यावर आल्याचे दिसून येत आहे.भाजपा कार्यकर्त्यांपासून जिल्ह्यातील वरिष्ठांपर्यंत उमेदवार बदलण्याचे पक्षांच्या जेष्ठ पदाधिकाऱ्यांकडे संकेतअगोदरच दिल्या गेल्याचे चित्र स्पष्ट केले आहे**

---

# मुलावर प्राणघातक हल्ला करणाऱ्या पित्यास पोलिस कोठडी...

**जनसंचलन/मेहकर**

मद्यच्या नशेत विभक्त राहणाऱ्या मुलावर पित्याने कुऱ्हाडीने वार करत गंभीर जखमी केल्याची घटना १७ मार्च रोजी डोणगाव पोलिस ठाण्यांतर्गत येत असलेल्या भोसा येथे घडली होती. या प्रकरणात पोलिसांनी आरोपी पिता विठ्ठल गाढवे विरोधात गुन्हा दाखल करत त्यास १८ मार्च रोजी अटक केली. न्यायालयाने त्यास दोन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे.या घटनेत गंभीर जखमी झालेला मुलगा कैलास विठ्ठल गाढवे (३५) याच्यावर छत्रपती संभाजीनगर येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत. मुलावर प्राणघातक हल्ला केल्यानंतर आरोपी पिता विठ्ठल गाढवे हा फरार झाला होता. विठ्ठल पांडुरंग गाढवे याने त्याचा मुलगा कैलास गाढवे याच्याशी महावितरण कंपनीचे गावात वायर टाकणे चालू असताना मद्याच्या व्यसनापायी वाद घालत प्राणघातक हल्ला केला होता. यामध्ये गंभीर जखमी झालेल्या कैलास गाढवेवर छत्रपती संभाजीनगर येथे उपचार सुरू आहेत. गंभीर जखमी कैलास हा आई- वडिलांपासून वेगळा राहत होता. त्याचा साडेचार वर्षांचा एक मुलगा व दीड वर्षाची मुलगी व पत्नी आहे. दरम्यान, या प्रकरणात पोलिसांनी १८ मार्च रोजी आरोपी विरोधात गुन्हा दाखल केला होता. ठाणेदार अमरनाथ नागरे व पोलिसांनी त्यास सोमवारी अटक केली. न्यायालयाने त्यास दोन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली.

# निवडणूक कालावधीत आचार संहितेचे काटेकोर पालन करावे-जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील

**जनसंचलन/बुलडाणा**

लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. सर्व विभागांनी या निवडणुकीत प्राधान्यक्रम आणि तातडीने करावयाची कार्यवाही करावी. तसेच संपूर्ण निवडणूक कालावधीत आचारसंहितेचे काटेकोरपणे पालन करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयात आचारसंहितेच्या अनुषंगाने सर्व विभागप्रमुख आणि जिल्हास्तरीय नोडल अधिकारी यांची बैठक घेण्यात आली. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे, जिल्हा पोलिस अधीक्षक सुनील कडासने, निवासी उपजिल्हाधिकारी सदाशिव शेलार, जिल्हा निवडणूक अधिकारी सुहासिनी गोनेवार, उपजिल्हाधिकारी सुरेश थोरात, समाधान गायकवाड, जयश्री ठाकरे, अजिंक्य गाडगे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी बी. मोहन, अतिरिक्त पोलिस अधीक्षक अशोक थोरात आदी उपस्थित होते. जिल्हाधिकारी म्हणाले, बुलडाणा मतदारसंघात दुसऱ्या टप्प्यात मतदान होणार आहे. नामांकन अर्ज दाखल करण्याच्या प्रक्रियेपासून मतमोजणी विविध टप्प्यावर अनुषंगीक कार्यवाही करण्यात यावी. आदर्श आचारसंहितेच्या पहिल्या टप्प्यात लोकप्रतिनिधींचे छायाचित्र किंवा नाव हटविण्याची प्रक्रिया तातडीने करण्यात यावी. तसेच कार्यालयांनी त्यांच्याकडील सुरू असलेली कामे आणि पूर्ण झालेली कामे यांची माहिती तातडीने सादर करावी. निवडणुकीच्या अनुषंगाने वाहनांची व्यवस्था करण्यात यावी. निवडणूक कालावधीत शासकीय वाहनांचा दुरूपयोग होऊ नये, याची काळजी घ्यावी. निवडणुकीच्या अनुषंगाने मतदान प्रक्रिया, मतमोजणीचे प्रशिक्षण देण्यात येतील. या प्रशिक्षणादरम्यान निवडणूक कर्तव्यावरील कर्मचाऱ्यांना मतदानाची सोय करण्यात आली आहे. यावेळी सेवेत असणाऱ्या संपूर्ण कर्मचाऱ्यांचे मतदान करण्यात येणार आहे. जिल्ह्यात ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅट मशिनची पुरेशी उपलब्धता आहे. या मशिनची तपासणी केल्यानंतरच विधानसभानिहाय वाटप करण्यात येणार आहे. मतदान केंद्रावर पुरेशा सोयी उपलब्ध करून देण्यात याव्यात. मतदारसंघात १ हजार ९६२ मतदान केंद्र राहणार असून यातील ५६ मॉडेल मतदान केंद्र राहणार आहे. या केंद्रावर महिला, युवक आणि दिव्यांग कर्मचारी कार्यरत राहणार आहे. तसेच निवडक मतदान केंद्राचे वेबकास्टींग होणार आहे. मतदानाचा टक्का वाढावा आणि नागरिकांचा निवडणुकीत सक्रीय सहभाग नोंदवावा यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येणार आहे. प्रामुख्याने कमी मतदान झालेल्या मतदान केंद्राच्या भागात जनजागृती करण्यावर भर देण्यात येणार आहे. तसेच ८५ वर्षे वय




आणि दिव्यांग मतदार मतदान केंद्रावर येण्यास सक्षम नसल्यास त्यांना घरून मतदान करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. यासाठी मतदान केंद्रास्तरीय अधिकारी यांच्याकडे रितसर मागणी नोंदवावी लागणार आहे. नियमानुसार चित्रिकरण करून संबंधित व्यक्तीचे मतदान करून घेण्यात येणार आहे. निवडणुकीदरम्यान कोणताही गैरप्रकार होणार नाही, याची काळजी घेण्यात यावी. नागरिकांनी तक्रारीसाठी सी व्हीजील, व्होटर हेल्पलाईन, क्नो युवर कँडिडेट यासारखी ऑनलाईन सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यामुळे नागरिकांनी निवडणूक प्रक्रियेत सक्रीय सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी केले.

# बैलगाडा शर्यतीला राजाश्रय मिळावा - संदीप शेळके

## बिबी येथे भव्य शंकरपटाचे उद्घाटन....

**जनसंचलन/ लोणार**

बैलगाडा शर्यत या खेळासोबत शेतकऱ्यांच्या भावना जोडलेल्या आहेत. बैलगाडा शर्यतीसाठी बैलांना तयार करतांना शेतकरी त्यांना पोटच्या लेकराप्रमाणे जीव लावतात. आज घडीला बाहेर खाजगी व्यक्ती, संस्थांच्या माध्यमातून शंकरपट भरवल्या जात असला तरी या खेळाला राजाश्रय मिळाला पाहिजे. भविष्यात आपल्याला जनतेने लोकसभेत पाठवले तर आपण त्यासाठी प्रयत्न करू असे प्रतिपादन वन बुलडाणा मिशनचे संकल्पक संदीप शेळके यांनी केले.

लोणार तालुक्यातील बिबी - वीरपांग्रा रस्त्यावर प्रवीण धाईत यांच्या शेतात आयोजित भव्य शंकरपट स्पर्धेचे उद्घाटन आज १८ मार्चला झाले. यावेळी संदीप शेळके बोलत होते. या स्पर्धेत तब्बल १ लाख ११ हजार रुपयांच्या बक्षीसाची जंगी लूट करण्यात येणार आहे . वन बुलढाणा मिशनचे संतोष बनकर, सुभान भाई परसुवाले, बबन भाऊ इंगळे, बाळू इंगोले यांच्यासह



त्यांच्या सहकाऱ्यांनी हा भव्य शंकरपट आयोजित केला आहे. आज उद्घाटन प्रसंगी बुलडाणा जिल्ह्यासह मराठवाड्यातून देखील बैलगाडा मालक या शंकरपटासाठी दाखल झाले होते.

# तांदुळवाडी नजीकच्या अपघातातील जखमीचा मृत्यू

**जनसंचलन/बुलढाणा**

तालुक्यातील हतेडी येथून कडधान्याचे पोते घेऊन जाणाऱ्या मालवाहू गाडीचा बुलढाणा-धाड मार्गावर तांदुळवाडी गावाजवळ टायर फुटल्याने वाहन उलटल्याची घटना १७ मार्च रोजी घडली होती. या अपघातात मागे पोत्यांवर बसलेले दोन जण बाहेर फेकले गेल्याने गंभीर जखमी झाले. यातील गंभीर जखमी शेख नसीम यांचा छत्रपती संभाजीनगर येथे नेत असताना वाटेतच मृत्यु झाला. दरम्यान, दुसरे जखमी संतोष तायडे याचीही प्रकृती गंभीर आहे. हा अपघात १७ मार्च रोजी दुपारी ४ वाजेच्या सुमारास घडला. हतेडी येथून कडधान्याचे पोते घेऊन तांदुळवाडीकडे निघालेल्या बोलेरो पिकअप गाडीचा धाड मार्गावर तांदुळवाडी गावाजवळ अचानक टायर फुटून अपघात झाला. यामध्ये वाहन उलटले. यात पाठीमागे पोत्यांवर बसलेले शेख नसीम (२५, रा. देऊळगाठ) आणि संतोष तायडे (३०, रा. हतेडी)




बाहेर फेकले गेले. त्यामुळे दोघेही गंभीर जखमी झाले, तर चालक किरकोळ जखमी झाला. शेख नसीम यांना छत्रपती संभाजीनगर येथे नेत असताना वाटेत त्यांचा मृत्यू झाला.

# दुचाकीस्वाराचा अपघात, एका गंभीर जखमीस अकोला हलविले...

**जनसंचलन/धाड**

गावापासून दोन किमी अंतरावर असलेल्या सावळी गावानजीक चांडोळ मार्गावरील शाळेजवळ एका अज्ञात मालवाहू वाहनाने दुचाकीस्वारांना धडक दिल्याने झालेल्या अपघातामध्ये दोघे जण जखमी झाले आहेत. यातील एकाची प्रकृती गंभीर आहे. हा अपघात १८ मार्च रोजी सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास घडला. दरम्यान, या अपघाताबाबत पोलिसांनाही वेगळा तर्क लावला आहे. बुलढाणा तालुक्यातील भडगाव येथील अमोल रामदास इर्शिद (३०) आणि संजय इर्शिद हे दोघे एमएच-२०-एयू-९४०० क्रमांकाच्या दुचाकीवर भडगाव येथून धाडकडे येत होते. सावळी गावानजीक असलेल्या शाळेसमोर मागून आलेल्या अज्ञात मालवाहू वाहनाने त्यांच्या दुचाकीला धडक दिली. त्यामध्ये दुचाकी समोरच्या लिंबाच्या झाडाला जाऊन धडकली व हा अपघात झाल्याची स्थानिकांमध्ये चर्चा आहे. या अपघातामध्ये अमोल रामदास इर्शिद हा युवक अधिक गंभीर जखमी झाला आहे. स्थानिकांनी त्यास बुलढाणा जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचारासाठी हलविले आहे.




दरम्यान, अपघाताची माहिती मिळाल्यानंतर, पोलिसांनीही घटनास्थळाची पाहणी केली असता, दुचाकीचा हेडलाइट लिंबाच्या झाडाला धडक लागून तुटलेल्या अवस्थेत दिसला आणि दुचाकी ही नाल्यात गेल्याचे दिसून आले. पोलिसांनी स्थानिकांना विचार पूस केली असता, दुचाकीस्वार मद्याच्या नशेत वाहन चालवत असताना एक मालवाहक वाहन आल्याने दुचाकीस्वाराचे वाहनावरील नियंत्रण सुटून दुचाकी झाडावर धडकून हा अपघात घडल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला. त्यामुळे या अपघाताबाबत दोन तर्क व्यक्त करण्यात येत आहेत. या अपघातप्रकरणी अद्याप धाड पोलिसांमध्ये तक्रार दाखल करण्यात आलेली नाही. अपघातामधील गंभीर जखमीस बुलढाणा येथून नंतर अकोला येथे उपचारासाठी हलविण्यात आले आहे. धाड पोलिस पुढील तपास करत आहेत.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनकल्याणाचा प्रहरी!



# प्रत्येक घरात पोचताहेत रविकांत तुपकरांचे स्वाभिमानी शिलेदार...

**जनसंचलन/बुलडाणा**

लोकसभा निवडणुकीच्या निमित्ताने शेतकरी नेते रविकांत तुपकर निर्धार परिवर्तन यात्रेच्या माध्यमातून गा-वोगावी फिरत आहेत. तर रविकांत तुपकरांच्या स्वाभिमानी शिलेदारांनी देखील जिल्हाभर निर्धार परिवर्तन अभियान हाती घेतले आहे. प्रत्येक गावात आणि गावातील प्रत्येक घरात पोहोचून रविकांत तुपकर यांनी आजवर केलेली आंदोलने आणि चळवळ व रविकांत तुपकरांचे विचार मांडण्यासह परिवर्तनाचा निर्धार करत आहेत. जिल्ह्यातील ८०% गावांमध्ये हे अभियान पोहोचले आहे, हे विशेष.

रविकांत तुपकर यांच्या माध्यमातून शेतकरी, कष्टकरी, तरुण आणि सर्वसामान्य जनतेचा बुलंद आवाज लोकसभा सभागृहात पोहोचावा यासाठी जिल्ह्यात सध्या जोरदार वातावरण तयार होत आहे. गेल्या २२ वर्षापासून शेतकरी, कष्टकरी, शेतमजूर, तरुण आणि सर्वसामान्य जनतेसाठी रविकांत तुपकर नावाच वादळ सत्ताधारी तसेच प्रस्थापितांविरोधात लढा देत आहे. शेकडो केसेस तुपकरांनी अंगावर घेतल्या, पोलिसांचा लाठ्याकाठ्या झालेल्या, तुरुंगवास भोगला, तडीपारी ससली, अगदी आक्रमक तसेच जीवघेणी आंदोलने केली.

आंदोलनामुळे शेतकऱ्यांच्या पदरात नेहमीच काही ना काही मिळाले हे देखील वास्तव आहे. सर्वसामान्यांचा



हा आवाज लोकसभेत पोहोचला पाहिजे या उद्देशाने आता गाव खेड्यातील तसेच शहरी भागातील नागरिक स्वतः हून समोर येत आहेत. तिकडे रविकांत तुपकर यांची निर्धार परिवर्तन यात्रेला जिल्ह्यात जोरदार प्रतिसाद मिळला. त्यांच्या सभांना गावोगावी प्रचंड गर्दी होत आहे. तर नागरिक स्वयंस्फूर्तीने पुढे येऊन लोकसभा निवडणुकीच्या खर्चासाठी लोकनिधी जमा करत आहेत. यामुळे जिल्ह्यात रविकांत तुपकरांच्या बाजूने परिवर्तनाची एक लाट निर्माण झाल्याचे चित्र पहायला मिळत आहे. तर रविकांत तुपकरांच्या स्वाभिमानी शिलेदारांनी परिवर्तन निर्धार अभियान हाती घेतले आहे. भाऊ तुम्ही गेली २२ वर्ष घरादारावर तुळशीपत्र ठेवून केवळ सर्वसामान्य जनतेसाठी लढा देत आहात. आता तुमच्या पदरात मतांचे दान टाकून जिल्ह्यात परिवर्तन घडविणे ही आमची जबाबदारी आहे. आता ही लढाई तुमची नाही तर ही लढाई आमची आहे आणि आमची लढाई आम्ही जिंकणारच असा निर्धार समर्थक, पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी केला असून गेल्या ७ मार्चपासून प्रत्येक तालुक्यात पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या वेगवेगळ्या टीम गावो-गावी जाऊन प्रत्येक घरापर्यंत पोहोचत आहेत. प्रत्येक घरात रविकांत तुपकर यांच्या कार्याची माहिती देत, येणाऱ्या लोकसभेत परिवर्तन घडवायचेच अशी शपथ हे कार्यकर्ते घेत आहेत. एकंदरीत प्रचार सुरू होण्यापूर्वीच रविकांत तुपकरांच्या स्वाभिमानी शिलेदारांनी जिल्ह्यातील ८० टक्के गावांमध्ये पोह-ोचून रविकांत तुपकरांचे नाव घरा-घरात पोहोचविले आहे. त्यामुळे आता जिल्ह्यात परिवर्तनाचे वारे वाहू लागले असून जिल्ह्यात परिवर्तन घडणारच असे चित्र दिसून येत आहे.

# सबळीकरण योजनेच्या शेलोडी येथील प्रकरणी शासनाच्या निर्णयाप्रमाणे कार्यवाही

**जनसंचलन/बुलढाणा**

कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजनेबाबत दै. देशोन्नतीच्या दि. १८ मार्च २०२४ रोजी बातमी प्रसिद्ध करण्यात आली आहे. सदर शेलोडी येथील प्रकरणी शासनाच्या नियमाप्रमाणे कार्यवाही करण्याची कार्य प्रक्रिया कार्यान्वित आहे. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या शासन निर्णय दि. १४ ऑगष्ट २०१८ नुसार कर्मवीर दाद-ासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजना राबविण्यात येते. तथापि दै. देशोन्नतीच्या दि. १८ मार्च २०२४ रोजी प्रकाशित केलेले वृत्त अनुषंगिक नाही. त्यामुळे सदर बातमीचा खुल-ासा सादर करण्यात येत आहे.

कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजनेबाबत मौजे शेलोडी, ता. खामगाव, येथील तक्रार समाज कल्याण कार्यालयास प्राप्त झाली आहे. सदर निवेदन वजा तक्रारीच्या अनुषंगाने प्रस्तुत कार्यालयात सुनावणी घेण्यात आली आहे. त्यावर कार्यवाही करण्यात आली आहे. तसेच जिल्हाधिकारी यांच्या आदेशानुसार मौजे शेलोडी येथील निवड करण्यात आलेल्या लाभार्थ्यांच्या आदेशास स्थगिती देण्यात आली आहे. तक्रारीच्या अनुषंगाने मौजे शेलोडी येथील प्रकरणाची सविस्तर चौकशी करुन शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही करण्याची कार्यप्रक्रीया कार्यान्वीत आहे, असे समाज कल्याण सहायक आयुक्त डॉ. अनिता राठोड यांनी कळविले आहे.

# मॉडेल डिग्री कॉलेजमध्ये जिल्हा परिषदेचे सीईओ विशाल नरवाडे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पदवी प्रदान

**जनसंचलन/बुलढाणा**



बुलढाणा येथील मॉडेल डिग्री कॉलेज मधुन बी.ए, बी. कॉम ,बी. एस .सी. उत्तीर्ण होऊन पदवी मिळवलेल्या विद्यार्थ्यांना पदवीचं वितरण बुलढाणा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यपालन अधिकारी विशाल नरवाडे यांच्या हस्ते करण्यात आलं... संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या बुलढाणा येथील मॉडेल डिग्री कॉलेजमध्ये पदवी प्रदान समारंभ १८ मार्चला आयोजीत करण्यात आला होत. या कार्यक्रमाला जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यपालन अधिकारी विशाल नरवाडे उपस्थित होते त्यांच्या हस्ते महाविद्यालयातून पदवी मिळवलेल्या विद्यार्थ्यांना पदवीच वितरण करण्यात आलं . या पदवी प्रदान कार्यक्रमाला संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे सिनेट सदस्य राजेंद्रप्रसाद पांडे , मॉडेल डिग्री कॉलेजचे मानद संचालक अण्णासाहेब म्हळसणे , चिखली पंचायत समितीचे माझे सभापती अरविंदबापू देशमुख , महाबीजचे माजी व्यवस्थापक अशोक निकम यावेळी व्यासपीठावर उपस्थित होते . सिनेट सदस्य राजेंद्रप्रसाद पांडे हे आपले विचार व्यक्त करतांना म्हणाले की आजचा आधुनिक काळा हा स्पर्धात्मक युगाचा आहे .या युगामध्ये टिकण्यासाठी प्रत्येकाने वेगवेगळ्या प्रकारचे ज्ञान संपादित करणे गरजेचे आहे. नोकरी आणि शिक्षण एवढा संबंध न ठेवता त्या ज्ञानाचा उपयोग स्वतःहाच्या व्यवसायासाठी, समाज हिताच्या कामासाठी केला गेला पाहिजे असं मतही त्यांनी यावेळी व्यक्त केल. तर महाविद्यालयाचे मानद संचालक डॉ .अण्णासाहेब म्हळसणे यांनी विद्यार्थ्यांनी आपल्या कला गुणांना वाव देऊन कार्यक्षम बना. स्पर्धात्मक युगात स्वतःच कर्तुत्व सिद्ध करा चांगले नागरिक बना आणि देशाची सेवा करा असं आवाहन त्यांनी पदवी मिळवलेल्या विद्यार्थ्यांना केल. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. वाय टी वाघ ,आभार प्रदर्शन प्रा किसन वाघ यांनी केलं तर सूत्रसंचालन महाविद्यालयाचे विद्यार्थी आनंद हिवाळे आणि राजेश रिढे यांनी केले . या कार्यक्रमाच्या यशस्वीसाठी प्राध्यापिका वसुधा घुमरे अश्विनी काळे समृद्धी गोडबोले अंजली लांडकर अर्चना गावंडे यांच्या सह महाविद्यालयाचे प्राध्यापक प्राध्यापक इतर कर्मचारी आणि मॉडेल डिग्री कॉलेजमधील आजी-माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते...

# मुख कर्करोग-आधुनिक उपचार इंडियन डेंटल असोसिएशन बुलडाणाची कार्यशाळा संपन्न

**जनसंचलन/बुलढाणा**

बुलडाणा येथील इंडियन डेंटल असोसिएशन तर्फे मुख कर्करोग निदान व आधुनिक उपचार या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन १६ मार्च ला स्थानिक हॉटेल नर्मदा इन येथे करण्यात आले.

छत्रपती संभाजी नगर येथील नामवंत कर्करोग तज्ञ डॉक्टर रचिता बाहेती व डॉक्टर अशुतोष तोंडारे यांनी सख-ोल मार्गदर्शन केले. सर्वप्रथम धन्वंतरी पूजन व मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी इंडियन डेंटल असोसिएशनचे अध्यक्ष डॉक्टर शरद जुमडे होते. तोंडाच्या कर्करोगाची समस्या सामान्यता धुम्रपान मद्यपान गुटखा किंवा तंबाखू खाण्यामुळे उद्भवते. तोंडात न भरून येणारी जखम तोंडातून रक्त येणे व तोंडात वाढत जाणारी गाठ




,तोंड कमी उघडणे ,जबडा दुखणे, सतत कान दुखणे ,वजन कमी होणे ,जिभेचे दुखणे या समस्याकडे दुर्लक्ष करू नये. कॅन्सर म्हणजे मृत्यू नव्हे. कर्करोगाच्या लक्षणाबाबत जागरूक राहून आणि त्वरित वैद्यकीय मूल्यमापन करून आधुनिक उपचार पद्धतीमुळे यशस्वी उपचार करणे शक्य असल्याचे डॉक्टर रचिता बाहेती यांनी सांगितले. यावेळेस डॉक्टर आशुतोष तोंडारे (स्तन विकार आणि कर्करोग तज्ञ ) तथा संचालक ( - ) यांनी समायोजित मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संचालन डॉक्टर सेजल निर्खे आणि आभार प्रदर्शन डॉक्टर सचिन किनगे सचिव आयडीए बुलढाणा यांनी केले. कार्यक्रमाला बुलढाणा व परिसरातील नामवंत डॉक्टरांची उपस्थिती होती.

# बुलढाण्यात उत्साहात पार पडला राज्यातील पहिला विधवा परीतक्ता, घटस्फोटीत महिलांचा सामूहिक पुनर्विवाह सोहळा...



**जनसंचलन/बुलढाणा**

देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे झाली मात्र अजूनही विधवा, परित्तका, घटस्फोटीत, एकल महिलांकडे समाजाचा दृष्टिकोन पाहिजे त्या तुलनेत बदललेला दिसत नाही, त्यांच्या बाबतीत आजही समाजात उदासीनता पाहायला मिळते, मात्र समाज बदलाची सुरुवात आता मातृतीर्थ बुलढाणा जिल्ह्यातून झालेली आहे, बुलढाण्यात अतिशय उत्साहात मानस फाउंडेशनच्या वतीने एकल महिला, विधवा, परितक्ता, घटस्फोटीत सर्वधर्मीय सामूहिक पुनर्विवाह सोहळा सत्यशोधक पद्धतीने संपन्न झाला.. हा विवाहसोहळा आगळावेगळा ठरला आहे.बुलढाणा शहरात हा सोहळा बघायला मिळाला आहे. आजच्या या दिवशी बुलढाणा शहरात सामूहिक पुनर्विवाह सोहळ्यामध्ये सात जोडप्यांनी आपली रेशीमगाठ बांधली, या अभिनव सोहळ्याचे बुलढाणा जिल्ह्यातील विविध क्षेत्रात काम करणारे नागरिक साक्षीदार झाले.. या सामूहिक पुनर्विवाह सोहळ्यामध्ये २५ ते ते ६५ वयोगटातील वधू-वरांनी आज आपल्या नवीन आयुष्याला सुरुवात केली, या सोहळ्यासाठी समाजातील सर्व स्तरातील नागरिकांनी भरभरून सहकार्य केले आणि आपल्या शुभेच्छा दिल्या हे पाहून अक्षरशः हे वधू वर भारावून गेले होते, या वधू-वरांना फेटे मुंडावळ्या आणि सजऊन धजवून त्यांची शहरातून मिरवणूक काढण्यात आली, डीजेसह जिल्हा पोलीस अधीक्षक सुनील कडासने यांनी पाठवलेल्या आपल्या पोलीस बँडने देखील विवाह सोहळ्याची शोभा वाढवली...

# ८० हजाराचे सोने असलेले पाकीट २ महिलांनी गायब केल्याची पो.स्टे.ला तक्रार

**जनसंचलन/मलकापूर**

सोने खरेदी करूण पोथ गाठवण्यास गेले असता अज्ञात दोन महिलांनी पिशवीमधील अंदाजे ८० हजार रूपयांचे सोने ठेवलेले पाकीट गायब केल्याची तक्रार मलकापूर शहर पो.स्टे.ला आज १८ मार्च रोजी दिल्यावरून पोलिसांनी अज्ञात महिलांविरूध्द गुन्हा दाखल केला आहे. याबाबत सविता श्रीराम काकडे रा. श्रीरामनगर मलकापूर यांनी पोलीस स्टेशनला दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, त्या त्यांच्या वहिनी रेखा चिम व प्रतिभा चिम रा. पंतनगर यांचेसोबत १७ मार्च रोजी दुपारी जुनी सोन्याची पोथ गाठवण्यासाठी तसेच नवीन सोने खरेदीसाठी शनि मंदिराजवळील भडगावकर ज्वेलर्स येथे गेले होते. यावेळी तेथून ४ ग्रॅम ६६० मिली. किं. ३१६९० रू. व सोन्याचे पेंडॉल ३ ग्रॅम १० मिली किं. २२५१० असे खरेदी केले. तसेच जवळ असलेली जुनी सोन्याची २४ ग्रॅम पोथ अंदाजे किं. २६ हजार रू. असे गाठवण्यासाठी गेले. मात्र गाठवण्याचे अधिक पैसे सांगितल्याने परत आले. दरम्यान दोन महिलांनी माझ्याकडे गाठवण्याचे किती पैसे सांगितले याबाबत विचारपूस केली. मी भडगावकर यांचे ज्वेलर्सकडे परत गेली असता त्या महिला माझ्या मागे आल्या. मी तेथून माझा भाऊ संदीप चिम यांच्या कापडाच्या दुकानात गेले असता जवळील पिशवीतील




सोने ठेवलेले पाकीट गायब झाले असल्याचे माझ्या निदर्शनात आले. त्यानंतर मी दागिन्यांचा शोध घेतला. परंतु मिळून आले नाही. माझा पाठलाग करणाऱ्या त्या दोन महिलांनीच माझ्या पिशवीतील सोने ठेवलेले पाकीट गायब केल्याची तक्रार सविता काकडे यांनी दिल्यावरून पोलिसांनी अप.नं.११८/२०२४ कलम ३७९, ३४ नुसार गुन्हा दाखल केला आहे.

# मानसिक छळ होत असल्याची पोलीस अधीक्षकांकडे तक्रार

**जनसंचलन/मेहकर**

मेहकर येथील एका संस्थानाच्या काही विश्वस्तांनी माझी खोटी अफवा पसरवून मानसिक छळ करण्याचा प्रयत्न केला असून संबंधित विश्वस्ताची चौकशी करून पोलिस कारवाई करावी, अशी मागणी येथील दिव्यांग असलेल्या ज्येष्ठ नागरिक प्रफुल्ल नारायण पापडे यानी जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्याकडे एका निवेदनद्वारे केली. जिल्हा पोलिस अधीक्षक यांना दिलेल्यां तक्रारीत त्यांनी आरोप केला आहे की, शहरातील एका धार्मिक सस्थानाच्या काही विश्वस्त यांनी माझी खोटी अफवा पसरवून पोलिस स्टेशनला तुमच्यावर गुन्हा दाखल झाल्याचे खोटे सांगून मला मानसिक त्रास देण्याचा प्रयत्न केला आहे. माझा कोणताही संबंध नसताना मला जाणूनबुजून वाद घालण्याच्या प्रयत्न करीत आहे. या लोकांपासून माझे जिवाला धोका असून संबंधित लोकांवर कारवाई करण्याची मागणी दिलेल्या निवेदनात पापडे यांनी केली आहे.

# ४५ वर्षीय व्यक्तीने केली गळफास घेउन आत्महत्या

**जनसंचलन/खामगाव**



इसमाने राहत्या घरी गळफास लावून आत्महत्या केल्याची घटना तालुक्यातील जळका भडंग येथे उघडकीस आली आहे. संजय ज्ञानदेव गायगोळ (४५) यांनी काल सायंकाळ दरम्यान राहत्या घरात छताला दोरीच्या सहाय्याने गळफास लावून आत्महत्या केली. काही वेळाने ही घटना उघडकीस आल्याने गावात एकच खळबळ उडाली. नातेवाईकांनी त्यांना तातडीने खामगाव सामान्य रुग्णालयात आणले असता डॉक्टरांनी तपासणी करुन त्यांना मृत घोषीत केले. या प्रकरणी शहर पोलिसांनी मर्ग दाखल केला असून पुढील तपास सुरु आहे. सदर इसमाने आत्महत्या का केली. याबाबत अद्याप नेमके कारण समजू शकले नाही.

